(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XI / Issue – III ISSN 2277-8063

# होलार समाजाचे मूळ उगमस्थान : एक चिकित्सक परीक्षण

**श्री. उमाकांत आण्णाप्पा हत्तीकट** संशोधक विद्यार्थी इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**गोषवारा :-**

महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या प्रवर्ग यादीमध्ये एकूण ५९ जातींचा समावेश असून त्यामध्ये अनु. क्रं. २६ ला आढळून येणारी 'होलार अथवा व्हलार' ही एक जात अतिशय महत्त्वपूर्ण जात होय. मध्ययुगीन काळापासून होलार समाजाचा ऐतिहासिक संदर्भ उपलब्ध असून संबंधित जात गावगाड्यात पिढीजातपणे वाजपाची सेवा बजावून आपले अर्थार्जन करत आलेली आढळते. सन २०११ च्या भारतीय जनगणना अहवालानुसारप्रामुख्याने तिचे वास्तव्य महाराष्ट्र, गुजरातआणि कर्नाटक राज्यात आढळते. मात्र तुलनेने सर्वाधिक लोकसंख्या महाराष्ट्रराज्यात वास्तव्यास असल्याचे निदर्शनास येते.होलार समाजाचे मूळ उगम स्थानाबाबत संबंधित समाजबांधव आणि समाज अभ्यासक यांच्यामध्ये वेगवेगळी मत-मतांतरे असून त्यामाध्यमातून विभिन्न प्रवाद निर्माण झाले असल्याचे आढळते. संबंधीत प्रवादाची भूमिका होलार समाज अभ्यासक व समाजबांधव यांच्यामध्ये संभ्रम निर्माण करण्यास कारणीभूत ठरली. त्यामुळे संबंधित समस्येची उकल करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करून व उपलब्ध संदर्भ साधनाचा आधार घेवून प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रात स्थित असणाऱ्या होलार समाजाच्या मूळ उगमस्थानाचा चिकित्सकरित्या प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

१. होलार समाजाचे मूळ उगमस्थान व त्याविषयक संबंधित समुदायामध्ये अस्तित्वात असलेल्या प्रवादावर प्रकाश टाकणे.
२. होलार समाजाच्या जातकुळीच्या मूळ पाट्या व त्या संबंधित माहितीवर प्रकाश टाकणे.
३. ऐतिहासिक संशोधन पद्धतीच्याद्वारे संबंधित समाजामध्ये मूळ उगमस्थान विषयक कल्पित कल्पनांची शहानिशा करणे.

**संशोधन पद्धत्ती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक व तसेच दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आला असून त्याशिवाय समाजातील जाणकार समाजबांधवाच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

**होलार समाजाचे मूळ भौगोलिक स्थान**

भारतामध्ये विविध जात समूह अस्तित्वात असून ते वेगवेगळया भागात पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असलेले आढळतात. प्रत्येक जात समूह जरी पिढ्यान-पिढ्या एका विशिष्ट भौगोलिक भूप्रदेशामध्ये राहत असला तरी त्याचे त्या भागातून अर्थार्जन अथवा अनेक विविध कारणामुळे पोटाचा प्रश्न सोडवण्याच्या हेतूने स्थलांतर झालेले आढळते. त्यामुळे ज्या ठिकाणी ते स्थायिक झाले ते त्यांचे मूळ भौगोलिक स्थान नसले तर ते जगण्याच्या हेतूने प्राप्त झालेले स्थायित्व होय. २०११ च्या भारतीय जनगणना अहवालानुसार होलार किंवा व्हलार जात समुदाय महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक या तीन राज्यात आढळतो. सर्व राज्याच्या तुलेनेने होलार समुदायाची लोकसंख्या सर्वाधिक महाराष्ट्र राज्यामध्ये आढळते. महाराष्ट्र राज्यामध्ये अंतर्भूत होणाऱ्या सर्व जिल्ह्यामध्ये होलार समुदाय आढळतो. त्यापैकी पश्चिम महाराष्ट्रात संबंध लोकसंख्येपैकी ७८,३९८ लोकसंख्या आढळते. म्हणजेचे एकूण होलार किंवा व्हलार समुदायापैकी ७८.९८% लोकसंख्या पश्चिम महाराष्ट्रात आढळते.[१] त्यामुळे होलार समुदायाचा अभ्यास करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र हा भौगोलिक भूप्रदेश निश्चित करण्यात आला आहे.स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये होलार समाजाचे वास्तव्य प्रामुख्याने बॉम्बे प्रांत, म्हैसूर, राजस्थान प्रांत आणि मध्यप्रदेश इत्यादी भागात असल्याचे संदर्भ मिळतात. मात्र होलार समाजाचे वास्तव्य जरी या भागातील असले तरी त्यांचे मूळ स्थान कोणते होते ? याविषयी विविध संदर्भ साधने आणि विभिन्नसमाज अभ्यासकांनी विभिन्न मते मांडलेली आढळतात. होलार समाजाचे वास्तव्य जरी संदर्भित भागात आढळत असले तरी भौगोलिक प्रदेशानुरूप होलार समाजाने तेथील भागाची संस्कृती आत्मसात केली असल्याने ते त्या-त्या सम परिस्थितीशी समरस झालेले असले तरी देखील त्यांनी स्वतःची संस्कृती संवर्धित व जतन करण्याचा प्रयत्न केला आहे. विशिष्ट भागातील त्यांच्या सांस्कृतीक वारसामुळे त्यांना त्याच भागातील मूळ स्थान मानून ते तेथीलच आहेत असे समजून बहुतांशी अभ्यासकांनी होलार समाजाच्या उत्पत्ती स्थानाविषयी अभ्यास करून मते मांडलेली आढळतात. त्यानुसार होलार समुदायाच्या मूळ उगमस्थानाविषयी उपलब्ध साधने व मुलाखती यामधून प्रामुख्याने कर्नाटक, राजस्थान व महाराष्ट्र राज्याचा उल्लेख मिळतो. सदर राज्यामध्ये होलार समाजाचे मूळ आढळते व त्यासाठी आधार देणारी विविध संदर्भ साधने यास अनुरूप मानून सदर सिद्धांत संशोधनाच्या दृष्टीने तयार करण्यात आले आहेत. प्रस्तुत प्रदेशाच्या माहितीवरून होलार समाजाची उगमस्थाने याविषयी माहिती देणारे तीन सिद्धांत खालीलप्रमाणे विषद करण्यात आले आहेत

**अ) कर्नाटक मूळस्थित सिद्धांत :-**

**१. पुणे व सातारा गॅझेटियर :-**

पुणे दार्शनिकेमध्ये होलार जातीच्या उगम स्थानाविषयी अस्पष्ट संदर्भ मिळतो. त्यानुसार 'होलार हे कर्नाटकातील 'होलेयार' प्रमाणे दिसतात. त्यांना 'जमिनीशी निगडीत किंवा सबंधित असणारे लोक' असे संबोधले असून तत्कालीन काळात त्यांची पुणे

शहरातील लोकसंख्या ५०२ इतकी निदर्शनास आलेली आढळते. पुणे दार्शनिकेनुसार होलार समाज हा बाळाजी विश्वनाथ पेशवा यांच्या काळात म्हणजेच इ. स. १७१४ ते इ. स. १७२० च्या दरम्याने आला असावा व त्यांच्या नावानुरूप होलार समाज कर्नाटकातील असल्यासारखा दिसतो असा अस्पष्ट उल्लेख मिळतो. Holars, apparently the Kanarese Holeyars or men of the soil, are returned as numbering 502 and as found in Poona City only. They say they came into the district about the time of Balaji Vishvanath Peshwa (1714-1720), and their name seems to point to a Karnatak origin.[2] सातारा दार्शनिकेनुसार देखील होलार समुदायात आढळणाऱ्या नावामध्ये कन्नड भाषेचा प्रभाव आढळतो.Their Kanarese name and its apparent derivation from *hol* (K.) the ground seem to show that they are one of the early local tribes.[3]

होलार समाजाच्या उगमस्थानाविषयी पुणे दर्शनिकेतून मिळणाऱ्या माहितीचे इतिहासाचा दृष्टीने परीक्षण केल्यास असे निदर्शनास येते की, होलार आणि होलीयार यामध्ये कोणतेच रक्त संबंध आढळत नाही. होलार समुदायाची आडनावे पश्चिम महाराष्ट्रात जी आढळतात ती कर्नाटक भागामध्ये बहुतांशी आढळत नाही. पश्चिम महाराष्ट्राची भौगोलिक भू-सीमेलगत कर्नाटक राज्याचे बहुतांशी गावे लागतात. त्यामुळे सदर समुदायावर कन्नड भाषेचा प्रभाव आढळतो. पश्चिम महाराष्ट्रातील होलार समुदायाची लोकसंख्या सर्वाधिकपणे सोलापूर जिल्ह्यामध्ये आढळते. सोलापूर जिल्ह्याच्या अंतर्गत होलार समुदायाची लोकसंख्या सांगोला, मंगळवेढा आणि पंढरपूर या भागात सर्वाधिक वास्तव्यास असलेली आढळते. सांगली जिल्ह्यामध्ये जत, आटपाडी, वाळवा आणि मिरज तालुक्यामध्ये सर्वाधिक होलार समुदायाची लोकसंख्या आढळते. कोल्हापूर जिल्हयामध्ये होलार समुदायाची सर्वाधिक लोकसंख्या इचलकरंजी भागात एकवटलेली आढळते. सदर तालुक्याच्या संबंध प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कन्नड भाषिक असणाऱ्या भूप्रदेशाशी येतो. त्यामुळे होलार समुदायावर कन्नड भाषेचा प्रभाव पडलेला आढळतो. होलार समाजाचे ज्येष्ठ नेते श्री.नामदेव ऐवळे यांच्या समवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेमध्ये सांगितले की, होलार समाजाचा पिढीजात व्यवसाय गावामध्ये वाजपाचा होता. घरामध्ये खायची तोंडे जास्त वाढल्यामुळे वाजपाच्या बदल्यात गावाच्या माध्यमातूनजे काही मिळत होते त्यातून घराचा गुजारा करणे फारच अवघड असायचे. त्यामुळे जगण्यासाठी व काम मिळवण्याच्या हेतूने आमचे पुणे येथे स्थलांतर झाले.[४]

होलार समुदाय पुणे भागामध्ये जरी गेला असला तरी तो तेथील मुळचा नाही व प्रस्तुत संशोधनासाठी बनविण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या परीक्षणावरून दिसून येते की, पुणे जिल्ह्यामधील जो होलार समाज आढळतो तो मुळचा बहुतांशी सोलापूर, सातारा व सांगली भागातील आहे व हा आलेला समुदाय कामाच्या शोधार्थ या भागात आला होता. पुणे दर्शानिकेनुसार होलार समुदायाची नावे कन्नड सारखी भासत असली तरी तो मुळचा पश्चिम महाराष्ट्रातीलच आहे. मात्र होलार समुदायाची नावे कन्नड सारखी भासत असली तरी ती तशी भासण्याची महत्त्वपूर्ण शक्यता म्हणजे होलार समुदायाची बहुसंख्य लोकसंख्या कर्नाटक महाराष्ट्र भागाच्या सीमावर्ती भागात आढळतो. त्यामुळे कन्नड भाषेचा प्रभाव प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे त्यांच्यावर पडलेला आढळतो. समाज अभ्यासकांच्या माध्यमातून होलार समुदायावर कन्नड भाषेचा पडलेला प्रभाव यास केंद्रीभूत मानून ते मुळचे कर्नाटक राज्यातील आहेत हा सांगण्याचा प्रयत्न वारंवार केला जातो व त्यासाठी प्रमुख आधार म्हणून पुणे व सातारा दर्शानिकेचा पुरावा दिला जातो. परंतु प्रस्तुत शक्यतेचे संशोधनाच्या दृष्टीने परीक्षण केल्यानंतर त्या सत्याच्या कसोटीवर उतरत नाहीत म्हणून होलार समुदायाचा उगम कर्नाटक राज्यात झाला आहे असे म्हणणे संयुक्तिक नाही.

**२) डॉ. प्रभाकर मांडे :-**

डॉ. प्रभाकर मांडे हे भारतीय लोकसंस्कृतीचा व ग्रामीण भागातील विविध जाती व जमातीच्या लोकजीवनाचा डोळसपणे अभ्यास करणारे मानद अभ्यासक आहेत. त्यांनी त्यांच्या लेखनामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील लोक संस्कृतीची जतन करणारा व गावगाड्यामध्ये समावेष्टीत असणाऱ्या व नसणाऱ्या विविध जाती व जमातीना केंद्रीभूत मानून लेखन केलेले आढळते. त्यामध्ये 'गावगाड्याबाहेर' व 'मांग त्यांचे मागते' ही त्यांची उल्लेखनीय व प्रसिद्ध कृती आहे. 'मांग व त्यांचे मांगते' या पुस्तकामध्ये होलार समाजाच्या मूळ स्थानाविषयी उहापोह करण्यात आला आहे. त्यांच्या मते, "होलार जातीचे लोक कर्नाटकातून महारष्ट्रात आले असावेत. कर्नाटकात यांची वस्ती मोठी आहे. कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवरील जिल्ह्यात त्यांची वस्ती मोठी आहे. त्यांना कन्नड भाषा येते. ते जी बोली बोलतात त्यावरही कन्नड भाषेचा प्रभाव विशेषत्वाने दिसतो."[५]

प्रभाकर मांडे यांच्या मते, होलार समाजाचे मूळ स्थान कर्नाटक असावे व त्यासाठी संदर्भ देताना त्यांनी होलार समुदायाचे वास्तव्य कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्याच्या सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगतात. परिणामी पश्चिम महाराष्ट्रातील होलार समुदायावर कन्नड भाषेचा प्रभाव असलेला आढळतो. भाषिक प्रभाव तत्वाला केंद्रबिंदू मानून डॉ. प्रभाकर मांडे यांनी होलार समुदाय मुळचा कर्नाटक राज्यातील असावा अशी शक्यता मांडलेली आढळते. सदर शक्यतेचे प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने परीक्षण केल्यानंतर असे आढळते की,भारतीय जनगणना अहवाल २०११ नुसार होलार समुदायाची सर्वाधिक लोकसंख्या पश्चिम महाराष्ट्रात आढळते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये अंतर्भूत होणाऱ्या जिल्ह्यामध्ये होलार समुदायाची सर्वाधिक लोकसंख्या सोलापूर जिल्ह्यामध्ये आढळते. सोलापूर जिल्ह्यामध्ये होलार समुदायाची सर्वाधिक लोकसंख्या सांगोला, मंगळवेढा आणि पंढरपूर तालुक्यात आढळते.[६] सदर तालुक्यांचा भूसीमा कर्नाटक राज्यातील विविध कन्नड भाषिक भूभागाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जोडलेल्या आहेत. (उदा.

मंगळवेढा भागाची सीमा कर्नाटक राज्यातील चडचण, इंडी). कन्नड भाषेचा प्रभाव पाहण्याच्या दृष्टीने होलार समुदायाच्या अभ्यासासाठी बनविण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या परीक्षणावरून दिसून येते की, सीमावर्ती भागातील बहुतांशी होलार समुदायाला कन्नड भाषा अवगत असलेली आढळते. त्याचबरोबर सदर भागातील होलार समुदायाचे वैवाहिक व नात्यांचे संबंध कन्नड भाषिक भूप्रदेशामध्ये आढळतात. मात्र ते पश्चिम महाराष्ट्रातील होलार समुदायाच्या एकूण वैवाहिक व नातेसंबंधाच्या प्रमाणाच्या तुलनेने अतिशय अल्प आहे. केवळ पश्चिम महाराष्ट्राच्या कर्नाटक सीमावर्ती भागातील होलार समुदायावर कन्नड भाषेचा प्रभाव अथवा ती भाषा अवगत आहे म्हणून त्याचे मूळ स्थान कर्नाटक आहे हे डॉ. प्रभाकर मांडे यांचे मत तथ्यात्मक परीक्षण व संशोधनांती फोल ठरते. त्यामुळे होलार समुदायाचे मूळ उगमस्थान कर्नाटक हे आहे असे मानणे उचित ठरणार नाही. होलार समाजाचे मूळ उगमस्थान कर्नाटक होते व सदर मताला दुजोरा देणारी उपलब्ध संदर्भ साधनाचे परीक्षण अथवा तपासणी केली असता त्यामध्ये अनेक मर्यादा व वस्तुनिष्ठतेचा अभाव असल्याचे आढळते. त्यामुळे पुढील काळात होलार समाजाचा अभ्यास करताना त्याचे कर्नाटक हे उगमस्थान होते यास आधार मानून लेखन करू नये.

**३.चिंचणी भागाशी होलार समुदायाचे सांस्कृतिक सहसंबंध व मूळस्थान कल्पना**

कर्नाटक राज्यातीलरायबाग तालुक्यामध्ये चिंचणी भागामध्ये मायाक्का देवीचे यात्रा वैशाख महिन्यामध्ये भरते. चिंचणीची मायाक्का हि बहुजन समाजाचे श्रद्धा स्थान असून यामध्ये बहुतांशी धनगर व होलार समुदाय देवीच्या यात्रेसाठी अनेक वर्षापासून जात असलेला आढळतो. सोलापूर, सांगली, पुणे इत्यादी जिल्ह्यातील बहुतांशी होलार समुदाय चिंचणी मायाक्का देवीचा पूजक आहे. मंगळवेढा, सांगोला व पंढरपूर तालुक्यामध्ये होलार समुदायाच्या चिंचणी मायाक्काच्या सवाष्णी ज्येष्ठ महिन्यात शुक्रवार अथवा रविवार घातल्या जातात. पश्चिम महाराष्ट्रातील होलार पश्चिम महाराष्ट्रातील विविध जात समुहाचे धार्मिक जीवन श्रद्धाळू व अंधश्रद्धाळू स्वरूपाचे असल्याचे आढळते.होलार समाजाची स्वतंत्र संस्कृती अस्तित्वात असून तो स्वतःच्या प्रथा, परंपरा, देव- देवता आणि धार्मिक संस्कृती जपण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आलेला आढळतो. पश्चिम महाराष्ट्रातील होलार समुदायाचे चिंचणी मायाक्का देवीच्या जाण्याला केंद्रीभूत म्हणून लोकसंस्कृती अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांनी होलार जातीचे लोक मुळचे कर्नाटक भागातील असावेत अशी भूमिका मांडलेली त्यांच्या 'मांग व त्यांचे मांगते' या पुस्तकामध्ये मांडलेली आढळते. "त्याला दुजोरा देण्यासाठी होलार समाजातील बरेचेसे सीमावर्ती समुदाय रायबाग भागातील मायाक्का देवीच्या यात्रेत बहुतांशी एकत्रित येतो व हि देवी धनगर समाजाची असल्याचे आढळते. व तिचे ठिकाण कर्नाटक भागात आहे. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील होलार समाज हा महाराष्ट्रात वर्ष्यानोवर्षे राहत असला तरी यात्रेसाठी तो त्या ठिकाणी जमतोच म्हणून होलार समाज हा मुळचा कर्नाटकातील असावा हि शक्यता प्रभाकर मांडे यांनी मांडली आहे."[७]

होलार समाज अभ्यासक डॉ.आप्पासाहेब बिरुनके यांच्या मते, होलार जातीचे लोक कर्नाटकातील रायबाग येथील चिंचणी मायाक्का देवीचे पूजक आहेत व त्यांचा धार्मिक सबंध सदर पवित्र स्थळाशी येतो म्हणून तो मुळचा तेथीलच होता असे मानणे संयुक्तिक ठरणार नाही. त्यांच्या मते, "होलार समाज जर मुळात कर्नाटकातील असता तर त्यांची लोकसंख्या त्या राज्यात संबंध भागात व भागात अधिक प्रमाणात असणे क्रमप्राप्त होते, मात्र तसे आढळत नाही. उलट ती सर्वाधिक महाराष्ट्र राज्यातील संबंध जिल्ह्यात आढळते. तो केवळ कर्नाटकातील सीमावर्ती भागात अधिक आढळते. कर्नाटक राज्यामध्ये होलार या जातीला कन्नड "व्हाल्यार" असे संबोधले जाते. त्याचा मराठी अर्थ "महार" असा होतो. परंतु त्या भागातील होलार समाज स्वत:ला "व्हाल्यार" म्हणवून घेत नाही कारण होलार समाज महार जातीला कमी लेखतो. कर्नाटक मध्ये अस्पृश्य जातीच्या उतरंडीमध्ये होलार समाज स्वत:ला व्हाल्यार म्हणून घेण्याऐवजी मादर म्हणून घेणे पसंद करतो. "मादर" या कन्नड भाषेतील शब्दाचा मराठी अर्थ 'मांग' असा आहे. मांग हा महारापेक्ष्या श्रेष्ठ समजला जातो. कर्नाटक सीमावर्ती भागात असणाऱ्या बहुतांशी लोकसंख्या त्यांची आडनावे व जात होलार असताना त्यांची मांग लागलेली आढळते किंवा त्यांच्या गावकीतील कामाचे स्वरूप मांग जातीप्रमाणे असल्याने त्यांची जात मांग लागलेली आढळते. होलार जात त्या भागात अस्तित्वात असते तर अनुसूचित जातीत तिची नोंद १९५० च्या अगोदरच होणे क्रमप्राप्त होते, परंतु तसे आढळत नाही. म्हणून डॉ. प्रभाकर मांडे यांची,होलार जातीचे मूळस्थान कर्नाटक होते हि शक्यता यांची संशोधन कसोटीवर टिकू शकत नाही म्हणून होलार समुदायाचे मूळस्थान कर्नाटक होते असे मानणे संयुक्तिक नाही.[८]

**ब. होलार समुदायाचे मूळस्थान राजस्थान:-**

होलार समाजाच्या मूळ स्थानाविषयी होलार समाज अभ्यासक श्री. नितीन जाधव यांनी मागोवा घेण्याचा प्रयत्न केला असून त्यांच्याशी झालेल्या चर्चेमधून असे निदर्शनास आले कि, होलार समुदाय मुळचा राजस्थान मधील आहे व त्यास संदर्भ म्हणून काकासाहेब कालेलकर समितीच्या सर्वेक्षण अहवालाचा दुजोरा देण्यात आला. त्यांच्या मते, "होलार समाजाचे प्रथमता अस्तित्व कायदेशीररित्याकाका कालेलकर आयोगाने सर्वेक्षण व निरीक्षण केल्यानंतर राजस्थान मध्ये असल्याचे मान्य केले. त्यांच्या पाहणीतून राजस्थान मधील सिरोही या जिल्ह्यात होलार हि जात अस्तित्वात असून ती मागसामधील अतिमागास जात होय. त्यामुळे तिला अनुसूचित जाती मध्ये समाविष्ठ करण्यात यावे, अशी सूचना काका कालेलकर यांनी सन १९५५ मध्ये केली. "Holar or Valhar caste has notified on sr. no. 11 in the state of Rajasthan in Abu Road Taluka of Sirohi"[9]त्याचबरोबर होलार समाज

अभ्यासक नितीन जाधव यांच्या समवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेमध्ये त्यांनी होलार जातीमध्ये समाविष्ट असलेल्या जाधव कुळाचा इतिहास सांगितला. त्यानुसार 'जाधव' कुळीचे होलार बांधव बहुतांशी नशिक जिल्ह्यातील बागलाण या ठिकाणी वास्तव्यास असलेले आढळते. या भागातील राहणाऱ्या होलार जातीच्या वंशावळीची नोंद ठेवणारे राजस्थान मधील मनोज भाट यांनी होलार जातीचे जाधव यांच्या वंशावळीचे मुळ राजस्थान मधील चितोडगड असून त्यांचे पुढील कालखंडात अर्थार्जनासाठी स्थलांतर होऊन ते सातारा, पंढरपूर आदी भागात स्थिरावत जाऊन शेवटी जाधव घराण्याची ११ -१२ वी पिढी तळवाडे (भामेर) या ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेली आढळते. सातारा, फलटण जवळील ढवळ हे जाधवांचे मूळ स्थान होय असे सांगितले जाते."[१०] संबंधित संदर्भानुसार श्री. नितीन जाधव यांनी होलार समुदाय हा मुळचा राजस्थान येथील असल्याची शक्यता वर्तवली आहे.

उपरोक्त शक्यतेची संशोधन दृष्टीने पडताळणी केली असता असे निदर्शनास येते कि, होलार समाजाचे मुळ स्थान जर राजस्थान असेल तर त्या ठिकाणची लोकसंख्या सन १९६५ नंतर पाहवयास मिळत नाही शिवाय भारतीय सल्लागार समितीच्यामाध्यमातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालात आढळते कि कालेलकर आयोगाच्या शिफारशीने निर्देशित केलेली राजस्थान मधील होलार समाजाची लोकसंख्या नामशेष झालेली असून त्या जातीस अनुसूचित जातीच्या प्रवर्ग यादीतून काढून टाकण्यात यावे. "In Rajasthan on Sr. No. 126 Holar or Valhar caste is not found so this caste exclude from the scheduled caste order"[११]

होलार समाजाचे राजस्थान भागातील अस्तित्व इ. स. १९६५ नंतर पहावयास मिळत नाही. कालांतराने त्यांचे राजस्थान येथून प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे अर्थार्जनाच्या दृष्टीने स्थलांतर झाले असेल तर ते सभोवतालच्या अथवा नजीकच्या सुपीक भूप्रदेशात होणे क्रमप्राप्त होते. मात्र तसे आढळत नाही. २००१ च्या जनगणना अहवालानुसार होलार समुदायाची लोकसंख्या केवळ गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक आणि अल्पशा प्रमाणात मध्यप्रदेश इत्यादी राज्यात आढळते. यावरून स्पष्ट होते की, होलार समाजाचे मूळस्थान राजस्थान असावे हि शक्यता पूर्णपणे सत्य मानता येत नाही.

**क)होलार समाजाचे मूळस्थान महाराष्ट्र**

होलार समुदायहा मुळातच महाराष्ट्र राज्यातील होता. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनामध्ये नव्याने शक्यता मांडली असून त्यान्वये सिद्ध झालेले आढळते. प्रस्तुत शक्यतेला संशोधन दृष्टीने परीक्षण करण्यासाठी खालील महत्त्वपूर्ण पुराव्याचा आधार देण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने होलार समुदायाची महाराष्ट्र राज्यात आढळणारी बहुसंख्य लोकसंख्या व महाराष्ट्रात आढळणारे होलार समुदायाच्या प्रमुख कुळाचे (आडनावाचे) बुड इत्यादी पुराव्याचा संदर्भ सामावेष्टीत करण्यात आला आहे. प्रस्तुत संदर्भ पुराव्यांचे परीक्षण खालीलप्रमाणे:-

**१.होलार समाजाची बहुतांशी प्रमाणात महाराष्ट्रात आढळणारी लोकसंख्या**

आजचा महाराष्ट्र तत्कालीन काळात मुंबई प्रांत म्हणून ओळखला जात होता. मुंबई प्रांताच्या इ. स. १९०१ मधील जनगणना अहवालानुसार, 'होलार समुदायाची लोकसंख्या १०,२३३ इतकी होती. मुंबई प्रांतातील संबंधित होलार जातीची लोकसंख्या तत्कालीन कालखंडात अस्तीत्वात असलेल्या इतर प्रांतातील लोकसंख्येच्या तुलनेने सर्वाधिक होती."[१२] होलार समाजाचे लोक संपूर्ण महाराष्ट्रात आढळतात, होलार समाज अभ्यासक आर. बी. ठाकरे यांच्या मते, 'होलार जातीची लोकसंख्या प्रामुख्याने सोलापूर, सातारा. पुणे, कोल्हापूर, मुंबई, नाशिक. जळगाव आणि अहमदनगर या भागातमोठ्या प्रमाणात आढळते.' "The Holar mainly live in Sholapur, sangali, satara, Pune, Kolhapur, Bombay, Nashik, Jalgaon and Ahmednagar District of Maharashtra"[13] तदनंतरील काळात देखील होलार समुदायाची लोकसंख्या उत्तरोत्तर महाराष्ट्रात वाढत गेलेली आढळते. त्याला दुजोरा देणारे महत्त्वपूर्ण साधन म्हणजे सन २०११ लोकसंख्या जनगणना होय. त्यानुसार भारतीय महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात होलार समाजाचे आढळणारे अस्तित्व आढळते. मात्र त्यापैकी बहुतांशी लोकसंख्या पश्चिम महाराष्ट्रात आढळते.२०११ च्या भारतीय जनगणना विभागांतर्गत पश्चिम महाराष्ट्रात आढळणाऱ्या विविध जिल्ह्याची लोकसंख्या खालील प्रमाणे:-

**१: पश्चिम महाराष्ट्रातील होलार समुदायाची एकूण लोकसंख्या**

| जिल्ह्याचे नाव | होलार किंवा व्हलर जातीची एकूण लोकसंख्या | | | | | | जिल्हानिहाय स्त्री पुरुष प्रमाण | | जिल्हानिहाय एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण क्षेत्र | | | शहरी क्षेत्र | | | | | |
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | |
| पुणे | 3355 | 3170 | 6525 | 3376 | 3290 | 6666 | 6731 | 6460 | 13191 |
| सोलापूर | 13685 | 13104 | 26789 | 1639 | 1583 | 3222 | 15324 | 14687 | 30011 |
| सातारा | 5707 | 5621 | 11388 | 861 | 887 | 1748 | 6628 | 6508 | 13136 |
| कोल्हापूर | 746 | 775 | 1521 | 1264 | 1313 | 2577 | 2010 | 2088 | 4098 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सांगली | 7518 | 7316 | 14834 | 1540 | 1588 | 3128 | 9058 | 8904 | 17962 |
| **एकूण लोकसंख्या** | | | | | | | 39,751 | 38647 | **78398** |
| **एकूण राज्यातील होलार जातीची पश्चिम महाराष्ट्रातील आढळणारी लोकसंख्या टक्केवारी** | | | | | | | 71.63 | 72.07 | **71.98** |

[भारतीय जनगणना अहवाल-२०११ ]

उपरोक्त तक्ता क्रं.१ चे निरीक्षण केल्यास पहावयास मिळते कि, २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण होलार समुदायाची लोकसंख्या १,०८,९०८ इतकी असून त्यापैकी पश्चिम महाराष्ट्रामध्ये एकूण होलार समाजाची लोकसंख्या ७८,३९८ राहत असलेली आढळते. त्यापैंकी महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या ७१.९८% इतकी लोकसंख्या पश्चिम महाराष्ट्रात राहते. होलार समाजाची लोकसंख्या प्रामुख्याने पश्चिम महराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात अधिक प्रमाणात तर कोल्हापूर जिल्ह्यात कमी प्रमाणात आढळते.[१४]

उपरोक्त संदर्भ व त्याशिवाय इ. स. १९४१ पासून ते आजपर्यंत झालेल्या भारतीय लोकसंख्या जनगणना अहवालानुसार होलार समुदायाची सर्वाधिक लोकसंख्या महाराष्ट्र राज्यातच असल्याचे निदर्शनास येते. यावरून स्पष्ट होते कि, होलार समुदाय हा मुळचा महाराष्ट्र राज्यातीलच असून त्याचे मुळ पश्चिम महाराष्ट्रात असल्याचे आढळते. जर ते मुळचे येथील नसते तर त्यांची लोकसंख्या संपूर्ण महाराष्ट्रातच आढळण्याचे व सतत वृद्धिंगत होत राहण्याचे कोणतेच कारण नव्हते. म्हणून इतर राज्याच्या तुलनेने महाराष्ट्रात राज्यातील सर्वाधिक लोकसंख्या या कारणाने होलार समुदाय हा महाराष्ट्र राज्यातीलच होता हा निकष सत्याच्या कसोटीवर खरा ठरतो.

**२. होलार समाजातील प्रमुख कुळाचे (आडनावाचे) महाराष्ट्रात आढळणारे मूळस्थान**

होलार समुदाय हा मुळातच पश्चिम महाराष्ट्रातील असल्याचा दुसरा महत्त्वपूर्ण निकष म्हणजे होलार समाजातील महत्वपूर्ण कुळे व त्यांचे महाराष्ट्रातील आढळणारे मुळस्थान होय. प्रस्तुत संशोधनासाठी घेण्यात आलेल्या होलार समाजातील जाणकार व्यक्तीच्या मुलाखती, प्रश्नावली आणि सर्वेक्षण इत्यादी संशोधन आयुधाचा वापर करून प्रस्तुत निकषाचे परीक्षण केले. त्यानुसार असे निदर्शनास आले की होलार समुदायातील बहुतांशी लोकसंख्या पश्चिम महाराष्ट्रात आढळते. त्यामुळे होलार समुदायाच्या मुळाचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत भागातील होलार समुदायातील आढळणाऱ्या प्रमुख आडनाव कुळाचा शोध घेतला. त्यामध्ये विविध आडनाव कुळांची माहिती मिळाली. त्याचप्रमाणे विविध आडनाव कुळांचा इतिहास जाणून घेतला. सदर भागात आढळणाऱ्याव होलार समुदायाचा भाग असणाऱ्या प्रमुख आडनावाच्या किंवा कुळांच्या मुळपाट्या (ठिकाण) संशोधन आयुधांचा वापर करून शोधन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानुसार पुढील बाबीसमोर आल्या. त्या खालीलप्रमाणे

**२.५ : पश्चिम महाराष्ट्रातील होलार समुदायाची प्रमुख कुळे व त्यांच्या मूळ पाट्या (ठिकाण)**

| **अनु. क्रं.** | **आडनाव** | **आडनावाची मूळ पाटी** |
|---|---|---|
| १. | जाधव | ढवळ (फलटण) |
| २. | गुळीग | शिखर शिंगणापूर शेजारी माळशिरस मधील फडतरी आणि गौडवाडी (सांगोला) |
| ३. | हत्तीकट/हातेकर | (कोळा) |
| ४. | केंगार | (चोपडी)ता. सांगोला |
| ५. | पारसे | (कोळेगाव) ता. माळशिरस, चिक महूद |
| ६. | भंडगे | अजनाळे, हातीद |
| ७. | माने | कणेर इस्लामपूर ता. माळशिरस |
| ८. | ऐवळे | खवसपूर ता. सांगोला, आटपाडी |
| ९. | जावीर | नाजरे, दिगंची |
| १०. | हेगडे | आवळाई ता, आटपाडी) |
| ११. | चौगुले | पाटेगाव ता. कर्जत |
| १२ | गायकवाड | हराळवाडी |
| १३. | तोरणे | निमगाव(म.) ता. माळशिरस |
| १४. | बिरुनके | सोड्डी |
| १५. | करडे | जुजारपूर ता. सांगोला, गारवाड ता, माळशिरस |

| | | |
|---|---|---|
| १६. | नामदास | वडूज ता.खटाव, कारुंडे ता. माळशिरस |
| १७. | कांबळे | करगणी ता. आटपाडी |
| १८. | ढोबळे | मांडवे ता. माळशिरस, आणि मोही ता.मान |
| १९. | भजनावळे | कडलास ता. सांगोला |
| २०. | गेजगे | वाटम्बरे, अकोला ता. सांगोला, कारखेल ता. मान |
| २१. | गोरे | निरगुडी ता. फलटण, राख ता. पुरंदर |
| २२. | होनावर | घानवड ता. विटा |
| २३ | आवटे | बरड ता. फलटण |
| २४ | खांडेकर | हटकर मंगेवाडी ता. सांगोला, घरनिकी ता. आटपाडी |
| २५. | देसाई | (सावर्डे जि. कोल्हापूर, बांबवडे ता. पलूस) |
| २६. | कोडगर | बठाण ता. मंगळवेढा |

(संदर्भ :- प्रत्यक्ष स्थळ भेट, मुलाखती आणि संशोधन प्रश्नावली)

तक्ता क्रं. २ वरून असे निदर्शनास येते की, होलार समुदायाचे वास्तव्य प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील पश्चिम महाराष्ट्रात होते व सदर ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या संबंधित समाजाच्या आडनावाच्या मूळ पाट्या देखील पश्चिम महाराष्ट्रातीलच असल्याचे आढळून येते. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, होलार समुदायाचे मूळ स्थान महाराष्ट्र हेच होते.

**निष्कर्ष :-**

उपरोक्त दोन्ही संदर्भ पुराव्यांचे परीक्षण केल्यानंतर असा निष्कर्ष निघतो कि, होलार समुदायाचे मूळ उगमस्थान महाराष्ट्र राज्य हेच होते व इतर राज्यातील आढळणाऱ्या होलार समुदायाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सबंध महाराष्ट्र राज्याशी येतो. त्यामुळे होलार समाजाचा अभ्यास करणाऱ्या संशोधक व अभ्यासकांनी होलार समुदायाचे पश्चिम महाराष्ट्र हे मूळस्थान मानून अभ्यास करणे उचित व संयुक्तिक ठरेल.

**संदर्भ व तळटीपा**

**1.** Census of India, 2011.
**2.** https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/Poona%20District/Poona-I/home.htmlDate :-22/07/2017 Time :- 07:05 A.M.
**3.** Ibid, Date :- 22/10/2017, Time :- 7.00 A.M.
**4.** श्री.नामदेव ऐवळे, (अनौपचारिक चर्चा), दि. २६/०२/२०२०, वेळ :- रात्री १०.०५.
**5.** डॉ. प्रभाकर मांडे, 'मांग आणि त्यांचे मांगते', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-ऑक्टोबर १९९९, पृ. १५६.
**6.** Census of India 2011.
**7.** डॉ. प्रभाकर मांडे, 'मांग आणि त्यांचे मांगते', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-ऑक्टोबर १९९९, पृ. १५६.
**8.** मुलाखत- डॉ. आप्पासाहेब बिरुनके, मु. पो. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर, दि.१२/०५/२०१८ वेळ- सकाळी ०९.०० वाजता.
**9.** The gazettee of India, 'Thescheduled caste and the scheduled tribes lists (modification) order 1956', Notification published by Authority of Home Affairs, New Delhi, 29 October 1956, page No.1.
**10.**मुलाखत श्री. नितीन जाधव, मु. पो. तळवाडे, ता. बागलाण जि. नाशिक, दि. २४ मे २०१७.
**11.**Government Of India, 'The Report of Advisory Committee on The Revision the Lists of Scheduled castes and Scheduled Tribes', Published by Department of the Social Security, New Delhi- 1965, Page No. 47.
**12.**Census Of India, 1901
**13.**K. S. Singh (General Editor); B. V. Banu, B. R. Bhatnagar, D. K. Bose, V. S. Kulkarni& J. Sreenath (eds.), 'People of India' Part-I Vol - XXX, Published by Anthropological Survey of India in Association with popular Prakashan, Mumbai. 2004. Page No. 813.
**14.**भारतीय जनगणना अहवाल-२०११